# शुद्ध करणाऱ्याचा अग्नी



आशीष रायचूर

केवळ विनामूल्य वितरणासाठी
ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे मुद्रित व वितरित.
प्रथम संस्करण मुद्रित: सप्टेंबर 2002
मध्ये सुधारित डिजिटल आवृत्ती: जुलै 2021

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: bookrequest@apcwo.org
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, बायबलचे सर्व संदर्भ पवित्र बायबल, बायबल सोसायटी ऑफ इंडिया आवृत्तीतून घेण्यात आले आहेत. सर्व हक्क स्वाधीन. बायबल व्याख्या, इब्री व ग्रीक शब्द तसेच त्यांचे अर्थ खालील पुस्तकांतून घेण्यात आले आहेत:

Thayer's Greek Definitions, Published in 1886, 1889; public domain
Strong's Hebrew and Greek Dictionaries, Strong's Exhaustive Concordance by JamesStrong, T. D.LLD. Published in 1890; public domain
Vine's Complete Expository Dictionary of Old and New Testament Words @1984,1996, Thomas Nelson, Inc, Nashville, TN.

आर्थिक साझेदारी
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाषनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे "ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी" हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

डाक यादी
ऑल पीपल्स चर्चद्वारे विनामूल्य पुस्तके प्रकाशित झाल्यानंतर  आपण apcwo.org या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या यादीत वर्गणीदार म्हणून आपले नाव दाखल करू शकता.

# शुद्ध करणाऱ्याचा अग्नी

# अनुक्रमणिका

1. धातू शुद्ध करणाऱ्याचे काम ........ 1
2. शुद्धीकरणासाठी आग ........ 3
3. परीक्षणासाठी आग ........ 4
4. अग्नी काय आहे ........ 6
5. प्रत्येकास अग्नीने खारट केले जाईल ........ 10
6. जेव्हा आपण अग्नीतून चालतो ........ 11
7. त्या सर्वांचे मोल ........ 13

# 1. धातू शुद्ध करणाऱ्याचे काम

**जखऱ्या 13:9**
**तो तिसरा भाग मी अग्नीत टाकीन, रुपे गाळितात तसे मी त्यास गाळीन, सोने शुद्ध करितात त्याप्रमाणे त्यास शुद्ध करीन; ते माझे नाम घेतील तेव्हा मी त्यांचे ऐकेन; मी म्हणेन, हे माझे लोक व ते म्हणतील, परमेश्वर माझा देव.**

**स्तोत्रसंहिता 66:10-12**
**10 कारण हे देवा, तू आम्हास पारखिले आहे; रुपे गाळतात तसे तू आम्हाला गाळून पाहिले आहे.**
**11 तू आम्हास जाळ्यात गुंतविले; तू आमच्या कंबरेला भारी ओझे बांधिले.**
**12 तू मनुष्यांना आमच्या डोक्यावरून स्वारी करावयास लाविले; आम्ही अग्नीत व पाण्यात सापडलो, तरी तू आम्हास बाहेर काढून समृद्ध स्थळी आणिले.**

निपुण धातू शुद्ध करणारा (सोनार) त्याला म्हणतात जो शुद्ध धातूस मिश्र धातुपासून कसे वेगळे करावे ते जाणतो. भांड्यात किंवा भट्टीमध्ये अशुद्ध धातू मिसळतो. रूपे शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत चांदीमध्ये शिसे जोडले जाते. अशुद्ध धातू गाळत असतांना शिसे नाहीसे होते. एकदा मळी (अशुद्धी) काढल्यानंतर, धातूस उपयुक्त आणि शोभेच्या वस्तू म्हणून घडविता येते. या प्रक्रियेत ओतकाम, हातोडीने ठोकणे, मुलामा चढविणे, दाबणे इत्यादी पद्धतींचा समावेश होतो. धातू शुद्ध करण्यासाठी अग्नी आवश्यक आहे.

बायबल शिकवते की देव आपल्या लोकांना शुद्ध करणारा एक सोनार आहे. “रुपे गाळून शुद्ध करणाऱ्यासारखा तो बसेल, व लेवीच्या वंशजास शुद्ध करील; त्यास सोन्यारुप्याप्रमाणे शुद्ध करील, मग ते धर्माने परमेश्वराला बलि अर्पण करितील” (मलाखी 3:3). हा परिच्छेद जरी भविष्यातील कार्याचा उल्लेख करतो जे परमेश्वर आपल्या लोकांत करणार आहे, तरीही आम्हास पवित्र शास्त्रावरून कळते की परमेश्वर आपल्या लोकांस शुद्ध करू इच्छितो आजच्या दिवशी व घडीलासुद्धा. शुद्धीकरणाच्या प्रक्रियेसाठी अग्नीच्या उपयोगाची गरज भासते. अग्नीचा उपयोग शुद्धीकरणासाठी आणि धातूचे स्वरूप पारखण्यासाठी केला जातो. परमेश्वर देव शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत अग्नीचा उपयोग करतो जे तो आपल्या लोकांसाठी पाठवितो. जेव्हा बापतिस्मा करणाऱ्या योहानाने येशूचा परिचय घडवून दिला, तेव्हा त्याने म्हटले येशू लोकांस पवित्र आत्म्याने व अग्नीने बापतिस्मा देण्यास आला. “मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा पश्चातापासाठी करतो खरा; परंतु माझ्या मागून जो येत आहे तो माझ्यापेक्षा समर्थ

आहे, त्याच्या वाहणा उचलून चालण्याची देखील माझी पात्रता नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे” (मत्तय 3:11).

‘शुद्ध करण्यासाठी’ उपयोग केला जाणारा इब्री शब्द आहे ‘सराफ’; ष्जेंतंचीष्द्र ज्याचा अर्थ आहे ‘वितळणे,’ ‘उज्वल करणे,’ ‘शुद्ध करणे,’ ‘अग्नी परीक्षण करणे,’ ‘परीक्षा करणे’ आणि ‘कसोटीस लावणे’. या क्रियापदांचा उपयोग वितळण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख करण्यासाठी केला जातो ज्याद्वारे मूल्यवान धातूंमधील अशुद्धी दूर केली जाते. परमेश्वर आपल्या लोकांस शुद्ध करण्यासाठी कोणत्या अग्नीचा उपयोग करतो हे जाणून घेण्यासाठी आपण पवित्र शास्त्राचे परीक्षण करणार आहोत. ज्या लोकांनी स्वतःस परमेश्वरास अर्पण केले आहेत त्या लोकांच्या अंतःकरणांत आणि जीवनांत परमेश्वर कोणत्या पद्धतीने कार्य करतो ते शिकणे प्रोत्साहनदायक आहे. परमेश्वर त्याच्या लोकांच्या जीवनात कसे कार्य करतो आणि त्यांच्याशी कसा व्यवहार करतो त्या पद्धती व नमूण्यांविषयी आपण जितके अधिक जाणून घेऊ, तितके अधिक त्याच्या अधीन होणे आणि त्याच्यासोबत चालणे सोपे जाईल. ज्या पद्धतीने तो कार्य करतो त्याविषयी जेव्हा आपण अज्ञान असतो तेव्हा आपण हट्टी बनतो आणि आपल्या मनाचे करू इच्छितो. परमेश्वर देव आम्हास हे ओळखण्याची कृपा देतो की परमेश्वर त्याच्या लोकांचा शुद्ध करणारा व सोनार आहे. येशू अशा मंडळीसाठी येईल जिला डाग किंवा सुरकुती नसेल. यासाठी शुद्धीकरणाच्या प्रक्रियेची गरज भासेल. हे पुस्तक आम्हास देवाच्या मार्गांविषयी व हेतूंविषयी बुद्धिमान करील.

# 2. शुद्धीकरणासाठी आग

**स्तोत्रसंहिता 51:6**
**पाहा, अंतर्यामीची सत्यता तुला आवडते; तू माझ्या अंतर्यामाला ज्ञानाची ओळख करून दे"**

अग्नी शुद्धीकरणाचे प्रतीक आहे. तो पवित्रता आणि शुद्धता राखून ठेवतो. जेव्हा इस्राएली लोक युद्धावर गेले आणि लूट घेऊन आले, तेव्हा परमेश्वराने त्यांस आज्ञा दिली की प्रत्येक वस्तू जी अग्नीतून जाऊ शकते, तिला आगीत टाकले जावे. तो म्हणाला, "जे काही अग्नीत टिकण्याजोगे असेल ते अग्नीत टाकून काढिले म्हणजे शुद्ध होईल" (गणना 31:23अ). म्हणून जे काही अग्नीतून जाते त्यावर शुद्धीकरणाचा परिणाम घडून येतो.

बायबल आम्हास शिकविते की परमेश्वराला आंतरिक भागांत—आमच्या आंतरिक मनुष्यात सत्याची इच्छा आहे. इब्री भाषेत 'सत्य' या शब्दाचा अर्थ आहे 'निश्चितता,' 'स्थिरता' आणि 'विश्वसनीयता.' याद्वारे अवलंबून राहण्याचा, खंबीरपणाचा आणि विश्वसनीयतेचा बोध होतो. परमेश्वरास हे गुण असलेले लोक हवे आहेत. सत्य बाळगणारे लोक, ज्यांस परमेश्वराची सनातन संपत्ती विश्वासाने सोपविता येते, ज्यांच्यावर हा विश्वास ठेवता येतो की ते या दिवसांत व घडीस परमेश्वराच्या पक्षास उभे राहतील.

जेव्हा परमेश्वराच्या लोकांनी पाप केले आणि दुष्टपणात भटकत राहिले, तेव्हा परमेश्वर म्हणाला, "मी आपला हात तुला लावून क्षार घातल्यासारखा तुझे कीट गाळून नाहीसे करीन; ष्जेंतंचीएष् शुद्ध करणेद्ध, तुझ्यातील सर्व शिसे काढून टाकीन" (यशया 1:25). या संदर्भात, "कीट" आणि 'शिसे' अलंकारिक भाषेत पापाविषयी बोलतात. आपण यिर्मयाच्या पुस्तकातही असेच वाक्य पाहतो. "कपटाने घेरिलेली अशी तुझी वस्ती आहे; कपटामुळे ते मला ओळखण्यास अमान्य आहेत, असे परमेश्वर ह्यासाठी सेनाधीश परमेश्वर म्हणतो, पाहा, मी त्यास गाळून पारखीन; माझ्या लोकांच्या कन्येच्या वर्तनास्तव मी दुसरे काय करणार?" (यिर्मया 9:6-7). परमेश्वर त्याच्या लोकांस अग्नीतून नेतो यासाठी की त्यांस शुद्ध करता यावे आणि असे लोक बनविता यावे ज्यांचे आंतरिक मनुष्यत्व खरे आहे. स्तोत्रकर्ता प्रार्थना करतो, "माझ्याठायी शुद्ध अंतःकरण उत्पन्न कर."परमेश्वरास आम्हाला शुद्ध करण्याची व आम्हास सत्याने वागणारे लोक बनविण्याची संधी देत असतांना, ही आमचीसुद्धा प्रार्थना असली पाहिजे. अंतिम समयाविषयी दानीएलाने स्वर्गदूतास जे सांगितले ते वाचणे उत्तम ठरेल. "पुष्कळ लोक आपणास शुद्ध व शुभ्र करितील; ते स्वच्छ होतील" (दानीएल 12:10अ). मी त्या अनेक लोकांसोबत भागीदार बनू इच्छितो जे शुद्ध केले जातील, जे श्वेत व उज्वळ केले जातील. आपणासही असे वाटते हा माझा विश्वास आहे.

# ३. परीक्षणासाठी आग

**स्तोत्रसंहिता 7:9ब**
**न्यायी देव मने व अंतःकरणे पारखणारा आहे.**

आग किंवा अग्नी हे चारित्र्याचे परीक्षण करण्याचे प्रतीक आहे. विश्वासणाÚयांच्या न्यायाविषयी बोलतांना, बायबल सांगते की अग्नी प्रत्येकाच्या कामाची, ते कशाप्रकारचे आहे याविषयी पारख करील (1 करिथ 3:13). अग्नी पदार्थाचा गुण व खरे स्वरूप ठरवितो. म्हणून, परमेश्वर आम्हास हे पाहण्यासाठी अग्नीतून नेतो की आम्ही खरोखर कशाप्रकारचे लोक आहोत—आमच्या अंतःकरणांत खरोखर काय आहे. होय, परमेश्वर आमच्या अंतःकरणाचे विचार व हेतू ओळखतो. असे वाटते की आमचा खरा गुण ठरविण्यासाठी म्हणून आमचे केवळ परीक्षण करण्याकरिता व आमची पारख करण्याकरिता आम्हास परमेश्वराने अग्नीतून नेणे अनावश्यक वाटते. तथापि, पवित्र शास्त्रातून आपण शिकतो की परमेश्वर अगदी असेच करतो. लोकांस सोनाराच्या आगीत टाकून तो त्याच्या लोकांच्या अंतःकरणाची पारख करतो. “परमेश्वर नीतिमानाला कसास लावितो” (स्तोत्रसंहिता 11:5अ). ज्याप्रमाणे धातूस भट्टीत पारखले जाते, त्याचप्रमाणे परमेश्वर त्याच्या लोकांची अंतःकरणे पारखतो. “रुपे मुशीत व सोने भट्टीत तावून पाहतात, पण परमेश्वर हृदये पारखतो” (नीतिसूत्रे 17:3). दाविदाने आपल्या प्रार्थनेत घोषणा केली, “माझ्या देवा, मला ठाऊक आहे की, तुला हृदयाची पारख आहे; सरळता तुला पसंत आहे; मी तर आपल्या सरळ हृदयाने या सर्व वस्तू तुला आनंदाने समर्पिल्या आहेत” (1 इतिहास 29:17अ). पारखण्यासाठी दिलेला इब्री शब्द आहे ’नासा’ आणि त्याचे भाषांतर ‘प्रयत्न करणे, सिद्ध करणे आणि भुरळ पाडणे’ असेही केले जाते. यात व्यक्ती कसा प्रतिसाद देतो हे पाहण्यासाठी त्याची परीक्षा करण्याची मूळ कल्पना आहे.

जुन्या करारात परमेश्वर आपल्या लोकांची पारख कशी करतो त्या पद्धतीविषयी वाचणे मनोरंजक ठरते. रानातील प्रवासाविषयी बोलतांना मोशेने इस्राएली लोकांस सांगितले, “तुला लीन करावे आणि तुझ्या मनात काय आहे म्हणजे तू त्याच्या आज्ञा पाळिशील की नाही ह्याची कसोटी पाहावी म्हणून तुझ देव परमेश्वर ह्याने गेली चाळीस वर्षे तुला रानातून कोणत्या रीतीने चालविले ह्याचे स्मरण कर. मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल ह्याची जाणीव तुला व्हावी म्हणून त्याने तुला लीन केले, तुझी उपासमार होऊ दिली, आणि तुला किंवा तुझ्या पूर्वजांना माहीत नसलेला मान्ना खाऊ घालून त्याने तुझे पोषण केले” (अनुवाद 8:2-3). दावीद आणि यिर्मया दोघांनी परमेश्वर हृदये पारखतो याविषयी सांगितले आहे. “तू माझे हृदय पारखिले आहे, तू माझी

झडती घेतली आहे, तू मला तावूनसुलाखून पाहिले आहे, तरी तुला काही आढळले नाही; मी मुखाने अतिक्रमण करणार नाही, असा संकल्प मी केला आहे" (स्तोत्रसंहिता 17:3). "तथापि हे परमेश्वरा, तू मला जाणतोस, मला पाहतोस, तुजविषयी माझे हृदय कसे आहे हे तू पारखितोस; वधावयास न्यावयाच्या मेंढरासारखे त्यास बाहेर काढ; वधाच्या दिवसासाठी त्यास सिद्ध कर" (यिर्मया 12:3). स्तोत्रकर्त्याने ज्याप्रकारे प्रार्थना केली तशी प्रार्थना आपणास करणे शक्य होईल का, "हे परमेश्वरा, मला कसास लाव, माझी पारख कर; माझे अंतर्याम व माझे हृदय पडताळून पाहा" (स्तोत्रसंहिता 26:2).

# 4. अग्नी काय आहे

**मलाखी 3:2**
**त्याच्या आगमनाच्या दिवशी कोण निभावले? तो प्रगट होईल तेव्हा कोण टिकेल? कारण तो धातू गाळणाऱ्याच्या अग्नीसारखा, परटाच्या खारासारखा आहे**.

परमेश्वर आपल्या लोकांस शुद्ध करण्यासाठी कोणत्या 'अग्नीचा' उपयोग करतो? 'भट्टी' किंवा 'धातू गाळण्याचे भांडे' काय आहे जेथे परमेश्वर आम्हास शुद्ध करतो व आमची पारख करतो? पवित्र शास्त्राच्या अभ्यासावरून आपण तीन वेगवेगळे निष्कर्ष काढू शकतो.

## अग्नी हा परमेश्वराची उपस्थिती आहे

**अनुवाद 4:24**
**कारण तुझा देव परमेश्वर हा भस्म करणारा अग्नी आहे; तो ईर्ष्यावान देव आहे.**

अनुवाद 4:24 व इब्री 12:29 आम्हास सांगतात की आमचा परमेश्वर भस्म करणारा अग्नी आहे. जुन्या करारात परमेश्वराच्या उपस्थितीचे अथवा सान्निध्याचे अनेक उल्लेख अग्नीच्या दृश्य प्रकटीकरणाशी संबंधित आहेत. "सर्व सीनाय पर्वतावर धूर पसरला कारण परमेश्वर अग्नीतून त्याच्यावर उतरला. भट्टीच्या धुरासारखा त्याचा धूर वर चढला व सर्व पर्वत थरथरु लागला" (निर्गम 19:18). "पर्वताच्या माथ्यावर परमेश्वराचे तेज भस्म करणाऱ्या अग्नीसारखे इस्राएल लोकांना दिसत होते" (निर्गम 24:17).

जेव्हा आपण परमेश्वराच्या सान्निध्यात प्रवेश करतो, तेव्हा आपण त्या परमेश्वराच्या सान्निध्यात प्रवेश करतो जो भस्म करणारी आग आहे. या संदर्भात, 'भस्म' करण्याचा अर्थ त्याच्या उपस्थितीत जे काही स्वीकारणीय नाही ते जाळून टाकले जाईल व नष्ट होईल. मी अशा सभांत गेलो आहे व प्रार्थनेत वेळ घालविली आहे जेव्हा परमेश्वराची उपस्थिती भस्म करणारा अग्नी म्हणून अत्यंत प्रबळ होती. अशा वेळी आम्ही स्तब्ध राहिलो, कधीकधी आमच्या डोळ्यांतून आसवे ओघळत होती. आम्ही जाणले की परमेश्वर आमच्या अंतःकरणात शोध, तपासणी आणि शुद्धीकरणाचे सखोल कार्य करीत आहे. ओ! आम्हास आजच्या दिवस याची कितीतरी वाढत्या प्रमाणात गरज आहे. परमेश्वर स्वतः सोनाराच्या आग्नीसारखा आहे. त्याच्या सान्निध्यात राहिल्याने आम्ही शुद्ध होऊ.

## अग्नी परमेश्वराचे वचन आहे

यिर्मया 23:29 या वचनात परमेश्वर प्रश्न करतो, “परमेश्वर म्हणतो माझे वचन अग्नीसारखे...नव्हे काय?” परमेश्वराचे वचन जळणाऱ्या आणि भस्म करणाऱ्या अग्नीसमान आहे. देवाचे वचन आमच्या अंतःकरणांस शुद्ध करते व कसोटीस लावते. ते “कोणत्याहि दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, साधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतु ह्यांचे परीक्षक असे आहे” (इब्री 4:12, Amplified Bible). जुन्या करारात आपण योसेफ नावाच्या एका व्यक्तीविषयी वाचतो. परमेश्वर त्याच्याशी स्वप्नाद्वारे बोलला, त्याने त्यास गौरवी भविष्य दाखविले जे त्यास प्राप्त होणार होते. तथापि, त्याला गुलाम म्हणून विकण्यात आले आणि दूर देशात नेण्यात आले. त्याच्या कुटूंबापासून तो दूर झाला होता. आणि दूर देशात, त्याला कुठलाही अपराध नसतांना तुरूंगात टाकण्यात आले. “त्यांच्यापुढे त्याने एक मनुष्य पाठविला योसेफ दास म्हणून विकला गेला. त्यांनी त्याला बेड्या घालून त्याच्या पायांना इजा केली; त्याच्या गळ्यांत लोखंडी कडे अडकविले. त्याच्या सांगण्याप्रमाणे घडून येईपर्यंत परमेश्वराच्या वचनाने त्याला पारखिले” (स्तोत्रसंहिता 105:17-19). योसेफास जे सहावे लागले ते त्याला का सहावे लागले? अनेक कारणांपैकी एक येथे दिलेले आहे. परमेश्वराच्या वचनाने योसेफास पारखले व कसोटीस लावले. परमेश्वराचे अग्नीसमान आहे - ते पारखते व शुद्ध करते. जेव्हा परमेश्वर आमच्या अंतःकरणाशी बोलतो आणि त्याचे वचन आमच्याठायी टाकतो, तेव्हा त्याचे वचन पूर्ण होण्यापूर्वी आमच्यात शुद्धीकरणाचे व पारखण्याचे काम करील.

## अग्नी परिस्थिती, संकटे आणि परीक्षा आहेत

आपण असे संख्य प्रसंग पाहतो जेव्हा परमेश्वराने त्याच्या लोकांच्या अंतःकरणाची पारख करण्यासाठी परिस्थितींचा उपयोग केला. या पैकी काही परिस्थिती केवळ आज्ञापालनाची कामे होती ज्याची परमेश्वराने आपल्या लोकांतर्फे मागणी केली. इतर परिस्थिती असामान्य होत्या ज्यात त्याच्या लोकांनी स्वतःस अडकलेले पाहिले आणि ते काय करतील हे पाहण्यासाठी परमेश्वर ‘मागे उभा राहिला’. आणखी काही अग्नीमय परीक्षा आणि दुःखाची भट्टी होत्या ज्यांनी परमेश्वराच्या लोकांस कसोटीस लावले व त्यांची परीक्षा घेतली.

परमेश्वराने अब्राहामाकडून आज्ञापालन करून घेण्यासाठी त्याची परीक्षा घेतली. “या गोष्टी घडल्यावर असे झाले की देवाने अब्राहामास कसोटीस लाविले; त्याने अब्राहामा, अशी हाक मारिली, तेव्हा अब्राहाम म्हणाला, काय आज्ञा? देव म्हणाला, पुत्र, तुझा एकुलता एक प्रिय इसहाक यास घेऊन मोरिया देशात जा आणि मी तुला सांगेन त्या डोंगरावर त्याचे होमार्पण कर” (उत्पत्ति 22:1,2). “मग तो बोलला, तू मुलावर आपला हात चालवू नको, त्याला काही करू नको; कारण तू आपल्या मुलास, आपल्या एकुलत्या एका मुलासहि माझ्यापासून राखून ठेवले नाही, यावरून तू देवाला भिऊन चालणारा आहेस हे मला कळले” (उत्पत्ति 22:12). अब्राहाम परीक्षेतून यशस्वीपणे पार पडला!

गुलामगिरीचा देश, मिसर देश परमेश्वराच्या लोकांसाठी लोखंडी भट्टी होता. “तुम्ही आज आहा त्याप्रमाणे परमेश्वराची खास प्रजा व्हावे म्हणून त्याने तुम्हाला लोखंडी भट्टीतून, म्हणजे मिसर देशातून, बाहेर काढिले आहे” (अनुवाद 4:20).

आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, रान असे स्थान होते जेथे परमेश्वराने आपल्या लोकांच्या अंतःकरणास कसोटीस लावले. “तुला लीन करावे आणि तुझ्या मनात काय आहे म्हणजे तू त्याच्या आज्ञा पाळिशील की नाही ह्याची कसोटी पाहावी म्हणून तुझा देव परमेश्वर ह्याने गेली चाळीस वर्षे तुला रानातून कोणत्या रीतीने चालविले ह्यांचे स्मरण कर. मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल ह्याची जाणीव तुला व्हावी म्हणून त्याने तुला लीन केले, तुझी उपासमार होऊ दिली, आणि तुला किंवा तुझ्या पूर्वजांना माहीत नसलेला मान्ना खाऊ घालून त्याने तुझे पोषण केले” (अनुवाद 8:2-3).

परमेश्वराने जेव्हा लोकांस त्याने दिलेला मन्ना गोळा करण्यासाठी आज्ञा दिली, तेव्हा तो त्याच्या लोकांची परीक्षा घेत होता. “तेव्हा परमेश्वराने मोशेला म्हटले, पाहा, मी आकाशातून तुम्हासाठी अन्नवृष्टि करीन आणि लोकांनी बाहेर जाऊन एकएका दिवसाला पुरेल इतके जमा करावे, ह्यावरून ते माझ्या नियमाप्रमाणे चालतात किंवा नाही ह्याविषयी मी त्यांची परीक्षा पाहीन” (निर्गम 16:4).

परमेश्वराने कधीकधी खोट्या संदेष्ट्याचे वचन पूर्ण होऊ दिले यासाठी की त्याला त्याच्या लोकांची पारख करता यावी. “तुमच्यामध्ये एखादा संदेष्टा अथवा स्वप्न पाहणारा प्रगट झाला व त्याने तुम्हाला काही चिन्ह किंवा चमत्कार दाखविला, आणि त्या चिन्हाचा किंवा त्या चमत्काराचा तुम्हाला प्रत्यय आला, आणि तुम्हाला अपरिचित अशा अन्य देवांना अनुसरून त्यांची सेवा करण्याचे त्याने तुम्हाला सुचविले, तरी त्या संदेष्ट्याचे किंवा त्या स्वप्न पाहणाऱ्यांचे तुम्ही ऐकू नका; कारण तुम्ही आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने व संपूर्ण जिवाने प्रीति करता की नाही हे पाहण्यासाठी तुमचा देव परमेश्वर तुमची ही अशी परीक्षा पाहात आहे” (अनुवाद 13:1-3).

परमेश्वराने इस्राएलाविरुद्ध शत्रूंस संधी दिली यासाठी की त्याने नंतर त्यांचा उपयोग त्याच्या लोकांची कसोटी घेण्यासाठी करता यावा.” तेव्हा इस्त्राएलावर परमेश्वराचा कोप भडकून तो म्हणाला, मी ह्या राष्ट्राच्या पूर्वजांशी केलेला करार ह्याने मोडला आहे आणि माझी वाणी ऐकिली नाही. म्हणून यहोशवाच्या मृत्यूसमयी उरलेल्या राष्ट्रांपैकी कोणालाहि मी देखील येथून पुढे त्यांच्यासमोरून घालवून देणार नाही; पण त्यांच्याकरवी मी इस्त्राएलाची परीक्षा करीन आणि त्यांचे पूर्वज माझ्या मार्गाने चालत होते त्याप्रमाणेच ते चालतात की नाही हे पाहीन. म्हणून परमेश्वराने त्या राष्ट्रांना घालवून देण्याची घाई केली नाही, त्यांना राहू दिले आणि त्यांना यहोशवाच्या हाती दिले नाही” (शास्ते 2:20-23).

राजा हिज्कियाने स्वतःस बाबेलच्या राजदूतांसोबत एका परिस्थितीत पाहिले जेव्हा त्याची पारख करावी म्हणून परमेश्वर त्याच्यापासून दूर झाला. "तरीपण बाबेलच्या अधिपतींनी देशात घडलेल्या चमत्काराविषयी चैकशी करावयास वकील पाठविले, तेव्हा त्याची पारख करावी व त्याच्या मनात काय आहे ते जाणावे म्हणून देवाने त्यास सोडिले" (2 इतिहास 32:31).

परमेश्वर देव त्याच्या लोकांस सांगतो, "मी तुला गाळिले आहे. पण रुप्याप्रमाणे नव्हे; मी दुःखरूप भट्टीत तुला कसोटीस लाविले आहे" (यशया 48:10ब). क्लेश (आजार आणि रोग) भट्टी असू शकते जेथे आमची परीक्षा होऊ शकते, आम्हास कसोटीस लावले जाऊ शकते आणि शुद्ध केले जाऊ शकते. "त्याविषयी तुम्ही उल्हास करिता, तरी तुम्ही आता थोडा वेळ, भाग पडले तसे निरनिराळ्या परीक्षांमुळे दुःख सोसले; ह्यासाठी की, नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करितात त्या सोन्यापेक्षा मूल्यवान असे जे तुमचे विश्वासाच्या परीक्षेत उतरणे ते येशू ख्रिस्ताच्या प्रगट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान ह्यांस कारणीभूत व्हावे" (1 पेत्र 1:6-7).

# 5. प्रत्येकास अग्नीने खारट केले जाईल

**मार्क 9:49-50**
**49 कारण प्रत्येक मनुष्य अग्नीने शुद्ध केला जाईल.**
**50 मीठ चांगला पदार्थ आहे; परंतु मिठाचा खारटपणा गेला तर त्याला रुचि कशाने आणाल? तुम्ही आपणामध्ये मीठ असू द्या व एकमेकांबरोबर शांतीने राहा.**

अग्नी रूचि वाढवितो—विकास आणि परिपक्वता. मसाला (खारविण्याची प्रक्रिया) प्रतिरक्षक म्हणून देखील कार्य करतो. लक्षात घ्या की येशूने म्हटले की अग्नीने प्रत्येकास खारवले जाईल. खारवण्याच्या किंवा अग्नीद्वारे पारखण्याच्या प्रक्रियेतून कोणीही वाचू शकत नाही. अनेक ख्रिस्ती लोक परमेश्वराच्या या कामाविषयी अज्ञान असल्यामुळे जेव्हा परमेश्वर त्यांच्या जीवनात खारवण्याची प्रक्रिया सुरू करतो, तेव्हा दुःखी होतात. आम्हाला हे जाणून घेण्याची गरज आहे की जर आम्हास परमेश्वराच्या सान्निध्यात राहावयाचे असेल तर खारवण्याच्या प्रक्रियेची जागा दूसरी कुटलीही गोष्ट घेऊ शकत नाही किंवा त्याची तोड नाही. परमेश्वरास फक्त एक गोष्ट हवी आहे आधीनता आणि त्याच्या हाताखाली शरण जाणे. जेव्हा आपण अग्नीच्या खारवण्यापासून दूर पळ काढतो, तेव्हा आमच्यात मिठाची उणीव होते. आम्ही बेचव असे बनतो. आपण आपल्या सभोवतालच्या जगावर प्रभाव टाकू शकत नाही.

येशूचे उदाहरण पाहा. येशूविषयी भविष्यात्मकदृष्ट्या बोलतांना, पवित्र शास्त्र म्हणते, "हयास्तव प्रभु परमेश्वर म्हणतो; पाहा, सीयोनेत पायाचा दगड बसविणारा मी आहे; मी पारखलेला दगड आहे; ती पायाला योग्य अशी मजबूत व मोलवान कोनशिला आहे; विश्वास ठेवणाऱ्याची त्रेधा उडणार नाही" (यशया 28:16; 1 पेत्र 2:6). येशूची परीक्षा कशी झाली? आणि त्याच्या जीवनात याद्वारे कोणता हेतू पूर्ण झाला? "कारण ज्याच्यासाठी सर्व काही आहे, व ज्याच्याद्वारे सर्व काही आहे, त्याने पुष्कळ पुत्रांना गौरवात आणतांना त्यांच्या तारणाचा जो उत्पादक त्याला दुःखसहनाच्या द्वारे परिपूर्ण करावे हे त्याला उचित होते" (इब्री 2:10). आपण इब्री 5:8-9 या वचनांत वाचतो, "तो पुत्र असूनहि त्याने जे दुःख सोसले तेणेकरून तो आज्ञाधारकपणा शिकला; आणि परिपूर्ण केला जाऊन तो आपल्या आज्ञेत राहणाऱ्या सर्वांचा युगानुयुगींच्या तारणाचा कर्ता झाला." येशूला देखील 'अग्नी परीक्षेतून' जावे लागले. येशूला दुःख सहावे लागले आणि याद्वारे तो आज्ञापालन शिकला आणि त्याने स्वतःस आमच्या तारणाचा कर्ता म्हणून योग्य ठरविले. ज्या गोष्टी त्याने सोशिल्या त्याद्वारे तो सिद्ध झाला—परिपूर्ण करण्यात आला, परिपक्व करण्यात आला.

# 6. जेव्हा आपण अग्नीतून चालतो

**ईयोब 23:10-12**
**10 परंतु माझा मार्ग त्याला कळला आहे; त्याने मला पारखून पाहिले म्हणजे मी सोन्यासारखा निघेन. त्याच्या पावलावर माझे पाऊल पडत आले आहे;**
**11 मी त्याचा मार्ग धरून आहे; त्यापासून मी भ्रष्ट झालो नाही. त्याच्या तोंडची आज्ञा पाळण्यास मी माघार घेतली नाही; माझ्या स्वतःच्या मनोरथापलीकडे**
**12 मी त्याच्या तोंडची वचनें जतन करून ठेविली आहेत.**

कदाचित आपणास आढळून येते की आपण अग्नीमय परिस्थितीत आहात. कदाचित परमेश्वराने आपल्या जीवनात खारवण्याची प्रक्रिया सुरू केली असेल—आपणास अग्नीने पारखण्यास येत असेल. किंवा कदाचित ती अद्याप पुढे आहे आणि आपल्या जीवनाचा तो ऋतु अद्याप यावयाचा आहे. परमेश्वर आम्हास सोनाराच्या अग्नीत शुद्ध करीत असतांना त्या काळात आणि ऋतूत आपण काय करू शकता? आपल्याजवळ ईयोबाचे उदाहरण आहे. ईयोबाची चूक काहीही का असेना, आम्हास त्याची प्रशंसा केली पाहिजे आणि त्याच्या जीवनापासून शिकले पाहिजे. कोणीतरी जो परीक्षांतून आणि संकटातून गेला आणि विजयी झाला त्याच्याजवळ निश्चितच आम्हास शिकविण्यासाठी मौल्यवान धडे असतील. ईयोबाने घोषणा केली की तो कोठे जात आहे तो मार्ग परमेश्वरास माहीत होता आणि सर्वकाही संपल्यावर तो त्यातून सोन्यासारखा शुद्ध होऊन बाहेर निघेल. आम्हास अशी समज व दृष्टिकोण बाळगण्याची गरज आहे ज्यातून परमेश्वर आम्हास नेईल. अशा काळात, आपण परमेश्वराच्या वचनात दृढ धरावे आणि बाजूस होता कामा नये.

ईयोबाविषयी दूसरा महत्वाचा पैलू म्हणजे त्याचे धैर्य. आम्हास सांगण्यात आले आहे, “पाहा, ‘ज्यांनी सहन केले त्यांना आपण धन्य म्हणतो’, तुम्ही ईयोबाच्या धीराविषयी ऐकले आहे, आणि त्याच्याविषयीचा प्रभूचा जो हेतु होता तो तुम्ही पाहिला आहे; ह्यावरून ‘प्रभू फार कनवाळू व दयाळू’ आहे हे तुम्हास दिसून आले” (याकोब 5:11ब). विश्वासाच्या परीक्षेद्वारे धीर उत्पन्न होतो आणि परिणामतः जर आपण धीरास आपले कार्य पूर्ण करू दिले, तर आपण परिपूर्णता व संपूर्णता प्राप्त करू आणि आपणास कुठलीही उणीव राहणार नाही. “माझ्या बंधूनो, नाना प्रकारच्या परीक्षांना तुम्हाला तोंड द्यावे लागते तेव्हा तुम्ही आनंदच माना. तुम्हास ठाऊक आहे की, तुमच्या विश्वासाची पारख केल्याने धीर उत्पन्न होतो; आणि धीराला आपले कार्य पूर्ण करू द्या, ह्यासाठी की, तुम्ही कशातहि उणे न होता तुम्हाला अखंड परिपूर्णता प्राप्त व्हावी” (याकोब 1:2-4).

जर आपण धीर धरू, तर आपण परमेश्वरास आमच्यात कार्य करण्यास व त्याचा उत्तम हेतू पूर्ण करण्यास संधी देऊ. म्हणून आपण जेव्हा वेगवेगळ्या प्रकारच्या परीक्षांत पडतो तेव्हा त्यास आपणास आनंदाची बाब समजावे.

आमच्याजवळ येशूचे उदाहरण आहे जो त्याने सहन केलेल्या क्लेशांद्वारे शिकला. अनेक महत्वाच्या गोष्टी आहेत ज्या परमेश्वर जीवनाच्या अशा ऋतूंमध्ये आमच्या अंतःकरणाशी बोलेल.

आणि मग आमच्याजवळ प्रभूचे अभिवचन आहे की आम्ही अग्नीतून चालत असलो तरीही ती आम्हास भस्म करणार नाही, त्याची ज्वाला आम्हास पोळणार नाही. "तू जलातून चालशील तेव्हा मी तुजबरोबर असेन; नद्यांतून जाशील तेव्हा त्या तुला बुडविणार नाहीत; अग्नीतून चालशील तेव्हा तू भाजणार नाहीस; ज्वाला तुला पोळणार नाही" (यशया 43:2). या सर्व गोष्टींत तो आमच्यासोबत आहे आणि म्हणून आमच्या जीवनात काहीही वाईट घडणार नाही.

# 7. **त्या सर्वांचे मोल**

**नीतिसूत्रें 25:4**
**रुप्यातला गाळ काढून टाक, म्हणजे धातु गाळणाऱ्यासाठी त्याचे चांगले पात्र बनते.**

परमेश्वराचे लोक त्याचे मौल्यवान रत्न, त्याचा निधी आहेत. जे त्याच्या नावाचे भय धरतात त्याजविषयी "सेनाधीश परमेश्वर म्हणतो, मी नेमीन त्या दिवशी ते माझा खास निधी होतील" (मलाखी 3:17). आम्ही त्याचे मौल्यवान रत्न किंवा निधी बनावे, यापूर्वी मळी किंवा गाळ दूर करावा लागेल. कधी कधी याचा अर्थ अनेकदा आगीतून जाणे होऊ शकतो. "भट्टीत सात वेळा शुद्ध करून जमिनीवरील मुशीत ओतलेल्या रुप्यासारखी ती आहेत" (स्तोत्रसंहिता 12:6ब). आपण एके दिवशी त्याची मौल्यवान रत्ने, त्याचा खास निधी म्हणून घडविले जाऊ हे जाणून आम्हास किती आनंद होईल! आम्ही त्याच्या गौरवाचे व प्रशंसेचे कारण ठरू. त्याला आमचा अभिमान वाटेल आणि तो आम्हास अभिमानाने 'परिधान' करील.

प्रेषित पौलाने म्हटले, "तू सत्याचे वचन नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेहि कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी, असा स्वतःला सादर करण्यास होईल तितके कर" (2 तीमथ्य 2:15). परीक्षेद्वारे ज्यांची पारख करण्यात आली आहे आणि जे या परीक्षेत यशस्वी ठरले आहे, ते स्वतःस देवाच्या पसंतीस उतरलेले कामकरी असे पाहतील, जे या शेवटच्या वेळेच्या कापणीत भाग घेण्यासाठी स्वामीच्या उपयोगासाठी योग्य आहेत. जो आपल्या लोकांचे शुद्धीकरण करणारा आणि पवित्र करणारा आहे त्या परमेश्वरावर प्रेम करण्यास आपल्याला शिकले पाहिजे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर" च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता:

Account Name: All Peoples Church
Account Number: 0057213809
IFSC Code: CITI0000004
Bank: Citibank N.A., No. 5,
M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

कृपया लक्षात ठेवाः ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!

## FREE PUBLICATIONS

A Church in Revival*
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks*
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change*
Code of Honor
Divine Favor*
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling*
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God*
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed*
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife*
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens*
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith *
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus *
The Night Seasons of Life
The Power of Commitment*
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power*
The Wonderful Benefits of speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different*
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर **apcwo.org/books** उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्या पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई-मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org**

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4-5; इब्री 2:3-4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **www.apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा contact@apcwo.org

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्भुत गोष्टी केल्या.

ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, "पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे" (रोमियों 6:23). येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास - आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे - प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

**"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"** (प्रेषितांची कृत्ये 10:43).

**“की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल”** (रोम. 10:9).

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.

आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.

# ऑल पीपल्स चर्च

# बायबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र (एपीसी-बीसी) भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌भुत कृत्ये यावर जोर दिला जातो – सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

एपीसी-बीसी मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत:
Theology and Christian Ministry (C.Th.) में एक वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Theology and Christian Ministry (D.Th.) में दो वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Bachelor in Theology and Christian Ministry (B.Th.) में तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

दर आठवड्यास सोमवार ते शुक्रवार या दरम्यान सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग भरलेले असतात. विद्यार्थी, नोकरी करणारे आणि गृहिणी सर्व या वर्गांमध्ये उपस्थित राहू शकतात आणि दुपारी 1 नंतर कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असलेल्या स्त्री आणि पुरुषांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची सोय आहे. विद्यार्थी दर आठवड्यात दोन ते पाच तास क्षेत्रीय कार्य, विशेष परिसंवाद, दुपारी प्रार्थना आणि उपासना यात घालवतात. दुपारच्या सभा घरून येणार्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. आठवड्याच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना एक किंवा अधिक स्थानिक चर्चमध्ये सेवा करण्यास प्रोत्साहित केले जाते.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम याबद्दल अधिक माहितीसाठी आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी कृपया या साइटला भेट द्या: apcwobiblecollege.org

APC-BC is accredited by the
Nations Association for
Theological Accreditation (NATA).

ज्या लोकांनी स्वतःस परमेश्वरास अर्पण केले आहेत त्या लोकांच्या अंतः करणांत आणि जीवनांत परमेश्वर कोणत्या पद्धतीने कार्य करतो ते शिकणे प्रोत्साहनदायक आहे. परमेश्वर त्याच्या लोकांच्या जीवनात कसे कार्य करतो आणि त्यांच्याशी कसा व्यवहार करतो त्या पद्धती व नमूण्यांविषयी आपण जितके अधिक जाणून घेऊ, तितके अधिक त्याच्या अधीन होणे आणि त्याच्यासोबत चालणे सोपे जाईल. ज्या पद्धतीने तो कार्य करतो त्याविषयी जेव्हा आपण अज्ञान असतो तेव्हा आपण हट्टी बनतो आणि आपल्या मनाचे करू इच्छितो. परमेश्वर देव आम्हास हे ओळखण्याची कृपा देतो की परमेश्वर त्याच्या लोकांचा शुद्ध करणारा व सोनार आहे. येशू अशा मंडळीसाठी येईल जिला डाग किंवा सुरकुती नसेल. यासाठी शुद्धीकरणाच्या प्रक्रियेची गरज भासेल. हे पुस्तक आम्हास देवाच्या मार्गांविषयी व हेतूंविषयी बुद्धिमान करील.

आशीष रायचूर

All Peoples Church & World Outreach
#319 2nd Floor, 7th Main HRBR Layout
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560043
Karnataka India

Phone:+91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org